# पुणे जिल्हा क्रिकेट असोसिएशन निवडणूक २०२६-२०२९

(सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये क्रमांक एमएएच/१८२६/पुणे/८१ नुसार नोंदणीकृत)

(बॉम्बे सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९६० अन्वये एफ-१९०१/पुणे या क्रमांकाने नोंदणीकृत)

ईमेल : elections@pdcapunecricket.com

संपर्क: ९६१९४६०२०२

११/०६/२०२६

## आदेश

**सदस्य यादी वरील श्री भूषण देशपांडे यांची हरकत क्रमांक २, श्री जयंत भोसले यांची हरकत क्रमांक ३, श्री प्रशांत सातव यांची हरकत क्रमांक ४, श्री भारत मारवाडी यांची हरकत क्रमांक ५, व श्री किर्तीराज वाडेकर यांची हरकत क्रमांक ६ वरील संयुक्त आदेश**

-------

आज दिनांक ११/०६/२०२६ रोजी या सर्व पाच हरकतदारांची एकसारख्या हरकती असल्याने त्यांची एकत्रित सुनावणी घेण्यात आली. सादर सुनावणीत सदस्यांनी खालील मुद्दे उपस्थित केले,

१. सन २०२३ व २०२५ मध्ये AGM घेण्यात आली नाही.

२. मार्च २०२६ च्या AGM मध्ये निवडणूक या विषयाचा अजेंडा घेण्यात आला नाही.

३. कार्यकारिणी समितीस निवडणूक अधिकारी नेमणूक करण्याचे अधिकार नाहीत.

४. AGM मार्च वर नुसार आम्ही १७/०३/२०२६ रोजी हरकत घेतली परंतु ती विचारात घेण्यात आली नाही.

५. शासनाच्या २०२५ मध्ये केलेल्या सुधारणांमुळे, कार्यकारिणी ने २०२५ नंतर केलेले सर्व कार्य अवैध आहे.

६. आम्ही याचिका १७/२०२६ दाखल करून, मा. न्यायालयाने दिनांक २६/०५/२०२६ रोजी जाहीर नोटिस पारित केली, तरीही ३०/०५/२०२६ रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर केली आहे, यामुळे मा. न्यायालयाचा अवमान झाला आहे.

७. निवडणूक अधिकारी घेत असलेली निवडणूकीमुळे देखील मा. न्यायालयाचा अवमान होत आहे.

८. आम्ही हा मुद्दा मा. न्यायालयासमोर दिनांक ०९/०६/२०२५ रोजी सादर केला असून त्यावर १२/०६/२०२६ रोजी सुनावणी होणार आहे आणि तुम्हाला त्याची नोटिस काढलेली आहे.

९. सदस्यांचे पूर्ण नावे यादीत नसून त्यांची फक्त initial आहेत. ही नावे पूर्ण देण्यात यावीत. सदस्यांचे पत्ते पूर्ण नाहीत, ते पूर्ण करण्यात यावेत. निवडणूक अधिकारी यांनी स्वतः हे अद्ययावत करण्याबाबत कार्यवाही करावी.

१०. मयत सदस्य यांची नावे कमी करणे, थकबाकी असलेले सदस्य यांना तसेच खेळात व स्पर्धेत सहभागी न होणारे सदस्य यांना नियमानुसार निवडणुकीत सहभागी होण्यास मज्जाव करावा आणि त्यांना मतदानाचा हक्क देण्यात येवू नये.

११. निवडणूक कार्यक्रम पहिल्यांदा सर्वांना मिळाला आहे, तसेच संकेत स्थळावर देखील संपूर्ण माहिती दिली आहे ही स्तुत्य आहे तरी किती लोकांना निवडणुकीचे पत्र मिळाले नाही हे तपासून घ्यावे?

१२. दुबार, त्रिवार नाव असलेल्या सदस्यांना फक्त एकदाच मतदानाचा हक्क देण्यात यावा.

आदेश:

अ) वरील आक्षेपातील मुद्दा क्रमांक १, २, ३, ४, ५, ६, ७, व ८ या बाबी PDCA च्या कार्यप्रणालीशी निगडीत असून ते मा. सह धर्मादाय आयुक्त यांच्या न्यायालयासमोर सुनावणीस असून न्यायप्रविष्ट असल्याने या मुद्यांवर कोणतेही भाष्य नाही.

ब) मुद्दा क्रमांक ९, १०, ११ व १२ मान्य करण्यात येत आहेत. पुणे जिल्हा क्रिकेट असोसिएशन च्या अधिकारी/कर्मचारी यांनी निवडणुकीपूर्वी यादी शुद्ध करण्यासाठी व त्रुटी दूर करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावा.

क) सदर सदस्य यादीतील मयत अगर ॲबसेंट असल्याची माहिती मिळेल त्यांना चिन्हांकित करावे आणि मतदानाच्या दिवशी ते आल्यास त्यांची सखोल चौकशी करावी.

ड) दुबार अगर अनेक वेळा नाव असलेल्या सदस्यांना फक्त एकदाच मतदानाचा हक्क देण्यात यावा.

इ) थकीत असलेल्या सदस्यांना निवडणूक लढविण्याचा अगर मतदानाचा हक्क देण्यात येवू नये.

(अविनाश सणस)
निवडणूक अधिकारी

प्रती,

१) हरकत घेणारे सदस्य श्री भूषण देशपांडे, श्री जयंत भोसले, श्री प्रशांत सातव, श्री भारत मारवाडी आणि श्री किर्तीराज वाडेकर (माहितीसाठी)

२) पुणे जिल्हा क्रिकेट असोसिएशन (त्वरित कार्यावहीसाठी)